Please Consider the Environment Before Printing… **Date: 25/07/2025**

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## अभिजात संगीतकार सुधीर फडके



सुधीर फडके हे मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध गायक, संगीतकार होते. ते विशेषत: मराठी सुगम संगीतासाठी प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म २५ जुलै १९१९ रोजी कोल्हापूर येथे झाला. फडके यांनी अनेक अजरामर गीते संगीतबद्ध केली आहेत. त्यांची अनेक भक्तीगीते, सुगम संगीत आणि चित्रपट गीते प्रचंड लोकप्रिय आहेत. कवी ग.दि. माडगूळकर लिखित गीतरामायणाला फडके यांनी संगीत दिले. त्यांनी वामनराव पाध्ये यांच्याकडून शास्त्रीय गायन संगीताचे प्रारंभिक शिक्षण घेतले. त्यांनी १९४१ मध्ये आपल्या संगीत कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर पाच वर्षांनी ते प्रभात फिल्म कंपनीत संगीत दिग्दर्शक म्हणून रुजू झाले.

फडके यांनी २१ हिंदी चित्रपटांसह १११ चित्रपटांना संगीत दिले. रुक्मणी स्वयंवर, वंदे मातरम, निरुपमा आणि परिराणी, दोस्त असा तर असा, शापित, चोराच्या मनात चांदणे, आधार, बाजीरावांचा बेटा, जावई विकत घेणे आहे, अनोळखी, कार्तिकी, या सुखानो या, जोतिबाचा नवस, आराम हराम आहे, आपले दात आपले ओठ, थोरली जाऊ, पुढचं पाऊल आणि धाकटी सून हे त्यांनी संगीत दिलेले काही चित्रपट आहेत. संगीत दिग्दर्शनासोबतच त्यांनी नरवीर तानाजी, पोस्टातील मुली, आंधळा मागतो एक डोळा, जगाच्या पाठीवर, ते माझे घर, आम्ही जातो आमच्या गावा यांसारख्या चित्रपटांमध्ये गायन केले. त्यांनी 'मराठा स्फूर्ती गीत' हे भारतीय सैन्याच्या रेजिमेंट, मराठा लाईट इन्फंट्रीचे रेजिमेंटल गाणे तयार केले. फडके यांना 'हा माझा मार्ग एकला', या मराठीतील सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार, संगीत नाटक अकादमी पुरस्कार आणि सह्याद्री स्वररत्न पुरस्कार यांसह अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. अशा या ख्यातनाम संगीतकाराचे २९ जुलै २००२ रोजी मुंबईत निधन झाले.

Nashik Edition
Jul 25, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401